क्रमांक : कामगार-अ/निवासस्थान/१३०४८
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्लॉट नंबर जी-९, "प्रकाशगड",
अली यावर जंग मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

दिनांक : ५ एप्रिल १९९०

:: परिपत्रक ::

विषय :- कर्मचाऱ्यांच्या बदलीनंतर मंडळाचे निवासस्थान सोडणे व तत्संबंधात कार्यवाही.

----

या कार्यालयास असे आढळून येते की, ज्या कर्मचाऱ्यास मंडळाचे निवासस्थान रहावयास दिले आहे, ते कर्मचारी स्वत:ची बदली झाल्यानंतर तेथील निवासस्थान तडकतोब सोडण्याची व्यवस्था करत नाहीत. उलट बदलीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर त्यांच्या मर्जीप्रमाणे किंवा संबंधित सक्षम अधिकाऱ्याने बदली नंतरही ताब्यात ठेवलेले निवासस्थान रिकामे करण्याबाबत कळवतील तेव्हा ते निवासस्थान स्वत:च्या ताब्यांत काही मुदतीसाठी ठेवण्यासाठी अर्ज करतात. यात त्यांचे जुन्या निवासस्थानातील वास्तव्यास कांही महिने असेच निघून गेलेले असतात. म्हणजेच तो कर्मचारी त्या निवासस्थानात तितका कालावधी सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय रहात असतो. कर्मचाऱ्यांच्या अशा या वागण्यामुळे त्यांच्या जागी बदली होऊन आलेल्या नवीन कर्मचाऱ्यास किंवा प्रतिक्षा यादीवर असलेल्या कर्मचाऱ्यास मंडळाचे निवासस्थान मिळत नाही. कांही कर्मचारी बदलीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या लक्षात आल्यानंतर निवासस्थान ताब्यात ठेवण्याबाबतचा त्यांचा अर्ज संबंधित सक्षम अधिकारी (की ज्यांच्या अखत्यारीत पूर्वीची निवासस्थाने आहेत.) यांचे मार्फत न पाठवता दिर्घ काल लोटल्यानंतर बदलीच्याच ठिकाणाहून परस्पर पाठवतात. असे आलेले अर्ज या कार्यालयास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडे त्यांच्या शिफारस/अभिप्रायकरिता परत पाठवावे लागतात. अशाप्रकारे संबंधित कर्मचाऱ्यांकडून होणारी कार्यवाही ही कार्यालयीन शिस्त व नियमांस धरून होत नाही.

तरी मंडळाच्या निवासस्थानात राहणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांना तसेच ज्यांच्या अखत्यारीत निवासस्थाने येतात त्या सक्षम अधिकाऱ्यांना खालील स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत.

१) बदली झालेल्या कर्मचाऱ्याने मंडळाचे निवासस्थान त्या कार्यालयातून मुक्त झालेनंतर त्वरित सोडावे.

....२.

२) कार्यमुक्त झालेनंतर आणि अडचणींमुळे कर्मचा-यांस निवासस्थान सोडणे शक्य नसल्यास तसा प्रकारचा अर्ज अडचणीचे सविस्तर कारण स्पष्ट करुन सोबतच्या प्रपत्राप्रमाणे भरुन कार्यमुक्त होण्याच्या भरपूर अगोदर अर्ज केला पाहिजे आणि हा अर्ज तेथील संबंधित सक्षम अधिका-यांमार्फतच पुरेसा अवधी ठेऊन मुख्य कार्यालयास पाठविला पाहिजे.

३) संबंधित सक्षम अधिका-याने असाप्रकारे अर्ज प्राप्त होताच त्यांच्या ठिकाणच्या निवासस्थानाची परिस्थिती पाहून प्राप्त झालेल्या अर्जाबाबत शिफारस/अभिप्रायासह तो अर्ज त्वरित मुख्य कार्यालयास पाठविला पाहिजे.

४) बदली होऊन हजर झालेल्या ठिकाणाहून परस्पर मुख्यकार्यालयास अर्ज कोणत्याहि कर्मचा-याने पाठवू नये. असा अर्ज संबंधित कर्मचा-याने ज्या ठिकाणचे निवासस्थान ताब्यात ठेवले आहे तेथील स्थानिक सक्षम अधिका-यांमार्फतच अर्ज मुख्य कार्यालयास पाठविले पाहिजेत. कर्मचा-यांचे परस्पर बदलीच्या ठिकाणाहून असाप्रकारचे अर्ज आल्यास त्याबाबत कोणताहि विचार होणार नाही व त्या कर्मचा-याकडून निर्धारित दराने किंवा पिनल दराने म्हणजेच निर्धारित दराच्या दौडपट दराने भाडे वसूल करुन त्वरित निष्कासनाची (इव्हिक्शनची) प्रकरणे सुरु करणेबाबत सक्षम अधिका-यांना कळविले जाईल.

५) बदली होऊन कार्यमुक्त झालेल्या कर्मचा-याने मंडळाचे निवासस्थान त्वरित न सोडल्यास व अडचणींमुळे सविस्तर खुलासा करुन तसा अर्ज वेळेत न केल्यास तेथील स्थानिक सक्षम अधिका-याने संबंधित कर्मचा-यास निर्धारित भाडे आकारुन त्वरित निष्कासन (इव्हिक्शन) प्रकरणे सुरु करावीत व तसे मुख्य कार्यालयास त्वरित कळवावे.

६) बदली होऊन आलेल्या कर्मचा-याचे त्यांच्या अगोदरच्या ठिकाणचे मंडळाचे निवासस्थान ताब्यात ठेवणेबाबतचा अर्ज कर्मचारी हजर झालेल्या ठिकाणच्या वरिष्ठ अधिका-याने परस्पर मुख्य कार्यालयास पाठवू नये. असा प्राप्त झालेला अर्ज त्या वरिष्ठ अधिका-यांनी निवासस्थान ज्यांच्या अखत्यारीत आहे त्या सक्षम अधिका-याकडे अभिप्रायासाठी पाठवावा.

७) सक्षम अधिका-यांच्या शिफारस/अभिप्रायाशिवाय आलेले अर्ज मुख्य कार्यालयात विचाराधीन घेतले जाणार नाहीत आणि असे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अ.क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही होईल.

तरी मंडळाच्या निवासस्थानात राहणा-या आणि प्रशासकीय बदली झालेल्या संबंधित सर्व कर्मचा-यांस तसेच सक्षम अधिकारी व संबंधित इतर अधिकारी यांनी या सर्व आवश्यक बाबींची नोंद घ्यावी. या परिपत्रकास आपल्या कार्यालयात विस्तीर्ण प्रसिद्धी देण्यात यावी.

प्रति - सोबत :- प्रपत्र.

प्रेषण यादीप्रमाणे.

11.11.08 [signature]

सदस्य (प्रशासन)/सचिव

सांगत २२.३